# लोकराज्य

नोव्हेंबर २०२२/पाने ६०/किंमत ₹१०



# पेन्शन तुमच्या दारी

**सुधा सुधाकरन / संजीव राव**

**सरकारी सेवेतून निवृत्त झालेले ज्येष्ठ नागरिक त्यांच्या पेन्शन प्रकरणाची स्थिती जाणून घेण्यासाठी, पेन्शनसाठी लागणारा विलंब टाळण्यासाठी वेळेत पेन्शनधारकाला पेन्शन मिळावी, यासाठी प्रधान महालेखापाल कार्यालयाने एक पाऊल पुढे टाकले आहे.**

## प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - I, महाराष्ट्र राज्य

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची पेन्शन प्रकरणे/ सामान्य भविष्य निर्वाह निधी, अंतिम परतावा प्रकरणे प्राधिकृत/अंतिमीकरण लेखे संकलित करणे वार्षिक विनियोजन लेखे, वित्तीय लेखे तयार करण्याचे काम प्रधान महालेखापाल कार्यालयाकडून केले जाते. तसेच भारतीय प्रशासकीय सेवा, पोलीस, वन, अखिल भारतीय सेवेतील निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांची पेन्शन प्रकरणे, विधानसभा, विधानपरिषदेचे सदस्य, अशासकीय अनुदानित शाळा तसेच महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांची पेन्शन प्रकरणेदेखील कार्यालयाद्वारे प्राधिकृत केली आहेत. ५.१ लाखांहून अधिक चालू पेन्शन आणि १ लाखाहून अधिक कर्मचाऱ्यांचे सामान्य भविष्यनिर्वाह निधी खात्याच्या देखभालीचे काम या कार्यालयाकडून केले जाते.

जया भगत यांच्या निर्देशानुसार प्रधान महालेखापाल कार्यालयाने एक पाऊल पुढे टाकले आहे. यासाठी कार्यालयामार्फत विविध उपक्रम हाती घेतले आहेत. कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या १५ जिल्ह्यांतील (ठाणे, पालघर, पुणे, नाशिक, अहमदनगर, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, सांगली, धुळे, जळगाव, नंदुरबार, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई) तसेच पश्चिम आणि दक्षिण महाराष्ट्रात (पुणे, नाशिक आणि कोकण विभाग कार्यक्षेत्र) यांचा समावेश करण्यात आला आहे.



## 'पेन्शन संवाद' ऑनलाइन उपक्रम

एप्रिल २०२१ पासून पेन्शन संवाद हा ऑनलाइन उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाद्वारे राज्य निवृत्तिवेतनधारकांपर्यंत सहज पोहोचणे शक्य झाले आहे. या कार्यालयाशी संपर्क साधणे, संवाद साधणे, व्हॉट्सॲप किंवा झूम व्हिडिओ/व्हॉईस कॉलद्वारे संभाषणात भाग घेण्याची संधी दिली आहे. या उपक्रमामध्ये कार्यालयाचे अधिकारी, राज्य सरकारचे कोषागार अधिकारी, डिडिओ भाग घेऊ शकतात. पेन्शन संवाद हा उपक्रम दर आठवड्याला शुक्रवारी आयोजित केला जाणार आहे. यासाठी निवृत्तिवेतनधारक/ सामान्य भविष्यनिर्वाह निधी सदस्यांना नोंदणी करणे आवश्यक आहे.

निवृत्तिवेतनधारक सदस्यांना संवादासाठी खालील पर्याय दिले आहेत.

- प्रधान महालेखापाल कार्यालयाच्या संकेतस्थळावर पेन्शन संवाद लिंक उपलब्ध आहे. संवादाला उपस्थित राहू इच्छिणाऱ्या पेन्शनधारकांना ऑनलाइन फॉर्म भरता येतो.
- ०२०-७११७७७७५ या दूरध्वनी क्रमांकावर व्हॉईसमेल सेवा उपलब्ध आहे. ही सेवा २४/७ आणि वर्षातील ३६५ दिवस उपलब्ध आहे.
- १८००-२२००-१४ टोल-फ्री क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.३० ते सायं ६.०० या वेळेत पेन्शनसंबंधीच्या तक्रारी मांडता येतील.

## पेन्शन : ड्रॉप बॉक्स सेवा

पेन्शनधारकाला वेळेत मदत व्हावी यासाठी ऑनलाइन आणि फिजिकल ड्रॉप बॉक्स सेवा सुरू केली आहे. कार्यालयातील प्राप्त तक्रारींना वेळेवर प्रतिसाद देता यावा, यासाठी ड्रॉप बॉक्स सेवा सुरू केली आहे.

## पीएजी नॉलेज चॅनल व ऑनलाइन हेल्पडेस्क

कार्यालयाच्या संकेतस्थळावर नॉलेज चॅनेल (https://cag.gov.in/ae/mumbai/en) या हेल्पडेस्कवर मराठी, इंग्रजीतील व्हिडिओ, मॉड्युल्स कॅप्सूल लेखासंबंधीची माहिती आहे. या यंत्रणेद्वारे डिडिओ, कोषागार अधिकारी यांच्याकडून पेन्शनधारकांना मार्गदर्शन केले जाईल. राज्य सरकार, निवृत्तिवेतनधारक आणि सामान्य भविष्यनिर्वाह निधी सदस्य यांच्या प्रयत्नामुळे आणि सहभागामुळे हे परिवर्तन शक्य झाले.

(लेखक हे प्रधान महालेखापाल कार्यालय, मुंबई येथे वरिष्ठ लेखाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.)